MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १४ अंक : ३ पाने : ८ एप्रिल-मे २०२०
E-Magazine visit us on : www.mahatransco.in

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

सर्वप्रथम आपल्या सर्वांचं मनःपूर्वक आभार मानतो की, आपल्या सर्वांच्या योगदानामुळे कोरोनाच्या कठीण परिस्थितीमध्येही आपण आपली यंत्रणा कार्यरत ठेवली. या लॉकडाऊनच्या काळामध्ये सरकारकडून अनेक निर्देश आले व त्या निर्देशांचे पालन करून आपण कधी ५ टक्के, १० टक्के आणि ३० टक्के तर इतर क्षेत्रातील परिमंडळाच्या ठिकाणी १०० टक्के, मुंबई व पुण्यासारख्या रेड झोनमध्ये आता १५ टक्के मनुष्यबळ आपण प्रशासकीय कार्यालयात शासनाच्या निर्देशानुसार कार्यरत ठेवत आहोत.

- **पारेषण यंत्रणा सक्षम ठेवा**
- **संकटकाळातही टीम वर्क करा**
- **शासनाच्या निर्देशाचे पालन करा**
- **अधिकारी, कर्मचाऱ्यांचे योगदान**

इतर सर्व अधिकारी व कर्मचारी Work From Home करीत आहे. मात्र, अत्यावश्यक सेवेतील आपले अधिकारी व कर्मचारी सुरूवातीपासून १०० टक्के फिल्डवर कार्यरत आहेत. यामध्ये विशेषतः अभियंते, तंत्रज्ञ व यंत्रचालक यांचा समावेश आहे.

मला माझ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा अभिमान आहे की, या संकटसमयी त्यांनी व्यवस्थापनाने दिलेल्या निर्देशाचे व जबाबदारीचे चोख पालन केले. मला खात्री आहे की, भविष्यात सुध्दा ते आपली अविरत सेवा कायम ठेऊन आपले कर्तव्य चांगल्या प्रकारे पार पाडतील.

आज या कठीण परिस्थितीत भारतातील अधिकांश राज्ये Work From Home करीत आहेत, त्यावेळेस विजेची उपलब्धता अतिशय महत्त्वाची बनते. कारण, जर त्यामध्ये खंड आला तर लोकांना घरून काम करण्यास अडचणी येऊ शकल्या असत्या. तसेच अनेक उद्योगधंदे कोलमडून पडले असते.

व्यवस्थापनाने सुरक्षिततेबाबत दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करून पारेषण यंत्रणा २४ तास उपलब्ध करून देण्यास आपण यशस्वी ठरलो. तसेच ते काम करत असताना कोणतीही दुर्घटना किंवा विषाणू संसर्ग आपल्या यंत्रणेकरिता कार्यरत असलेल्या अभियंता व कर्मचारी यांना झाला नाही. त्याबाबत मी सर्वांचे कौतुक करतो.

प्रशासनाने एप्रिल व मे महिन्याचे वेतन सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना विनाविलंब दिले. तसेच ही यंत्रणा व्यवस्थित कार्यरत ठेवण्याकरिता दिलेल्या योगदानाबद्दल मी त्यांचे मनापासून कौतुक करतो. भविष्यातही अशा प्रकारची चांगली कामगिरी बजावतील, अशी मी आशा बाळगतो.

या कठीण परिस्थितीत आपण सर्वांनी स्वतःची व कुटुंबियांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे सुध्दा तितकेच महत्त्वाचे आहे. शासनाने दिलेल्या निर्देशाचे सार्वजनिक जीवनामध्ये पालन करणे गरजेचे आहे. अशा कठीण परिस्थितीत दिलेल्या नियमावलीच्या अधीन राहून आपण सार्वजनिक जीवनात वावरलो तर या विषाणूचा संसर्ग टाळण्यास मदत होईल. साहजिकच, अप्रत्यक्षपणे एका जबाबदार नागरिकाचे कर्तव्य आपल्याकडून पार पाडण्यास मदत होईल.

या कोरोना विषाणू संसर्गाच्या विरोधात लढण्यासाठी महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एका दिवसाचे वेतन सुमारे साडेतीन कोटी रूपये दिले. तसेच कंपनीने सुध्दा पुढाकार घेऊन आपल्या सांघिक सामाजिक जबाबदारी निधीतून (CSR) दोन कोटी रूपये राज्य आपत्कालीन व्यवस्थापनास दिले. कंपनीकडून शासनास एकूण सुमारे साडेपाच कोटी रूपये COVID-19 मदत व पुनर्वसनासाठी देण्यात आले. त्यापैकी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे योगदान मुख्यमंत्री सहाय्यता निधीस व कंपनीचे योगदान राज्य आपत्कालीन व्यवस्थापनास देण्यात आले. आपल्या सर्वांकडून मिळालेल्या या हातभाराकरिता मी आपला आभारी आहे. कोरोना विषाणू विरोधाच्या लढाईसाठी कंपनीने मदत व पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या काही स्वयंसेवी संस्थांनाही (NGO) मदत दिली आहे.

आपल्याला आणखीन एका आव्हानाला सामोरे जावे लागले, ते म्हणजे निसर्ग



**दिनेश वाघमारे** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

चक्रीवादळ. आपल्या सुदैवाने, या वादळात मुंबई किंवा राज्याला तडाखा बसला नाही. मात्र, या वादळाने रायगड, श्रीवर्धन, दिवेआगर किनारपट्टी व उरण येथील आपल्या यंत्रणेच्या जाळ्यांवर मोठी हानी पोहोचवली आहे. त्यामुळे तेथील यंत्रणा पूर्ववत करण्यावर आपला सर्वप्रथम भर आहे. त्यासाठी लागणारी सर्व प्रकारची साधने व्यवस्थापनाने उपलब्ध करून दिलेली आहेत. मला आशा आहे की, सांगली, सातारा, कोल्हापूर या ठिकाणी झालेल्या महाप्रलयामध्ये जशी आपण यंत्रणा युध्दपातळीवर पूर्ववत करण्यात यशस्वी झालो. त्याप्रमाणे, या ठिकाणी सुध्दा आपण सर्वांच्या प्रयत्नाने यशस्वी होऊ, याची मला खात्री आहे.

यापुढेही आपण शासन व प्रशासनाच्या सर्व निर्देशाचे तंतोतंत पालन करून सुरक्षित राहा. मला आशा आहे की, Reopening (1.0) व त्यापुढील व्यवस्थापनाच्या प्रयत्नामुळे आपल्याला आपली संपूर्ण यंत्रणा लवकरच पूर्ववत करता येईल.

**शुभेच्छांसह..!**

**- दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



नागपूर : राज्यातील वीजपुरवठा विनाव्यत्यय सुरू राहण्यासाठी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत हे स्वतः नागपूर नियंत्रण कक्षातून संपूर्ण राज्यभरातील अधिकाऱ्यांच्या संपर्कात होते.

Teamwork

■ ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी मानले आभार ■

# राज्यात विनाव्यत्यय वीजपुरवठा राहिला सुरू

■ *टीम महापारेषण/टीम महावितरण/टीम महानिर्मिती*

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी ५ एप्रिल २०२० रोजी केलेल्या लाईट बंद आवाहनाच्या वेळी वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी रात्री ८ वाजून ३९ मिनिटांपासून राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत हे नागपूर नियंत्रण कक्षातून संपूर्ण राज्यभरातील वीज अधिकाऱ्यांच्या संपर्कात होते. ९ मिनिटांच्या या अतिशय कठीण कालावधीत राज्यभरात विनाव्यत्यय वीजपुरवठा सुरू होता. या दरम्यान, कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. या यशाचं श्रेय ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी तिन्ही वीज कंपन्यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ, कर्मचारी आणि राज्यातील जनता आणि माध्यम प्रतिनिधींना दिले आहे.

दर तीन मिनिटांनी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत स्वतः विजेच्या आकडेवारीची नोंद घेत होते. ५ एप्रिलला रात्री ८ वाजून ३९ मिनिटांनी राज्याची विजेची मागणी १३३७७ मेगावॅट इतकी होती. नंतर हळूहळू विजेची मागणी कमी होत गेली. रात्री ९ वाजून १२ मिनिटाला १०७४१ इतकी मागणी होती. या दरम्यान, फ्रिक्वेन्सी ५०.२३ हर्टज इतकी महत्तम तर ५०.०९ हर्टज इतकी न्यूनतम नोंद करण्यात आली.

या कालावधीत तिन्ही वीज कंपन्यांचे सुमारे ४९ हजार कर्मचारी काम करीत होते. वीज उत्पादनात कोयना जलविद्युत केंद्र, उरण वायू विद्युत केंद्र तसेच औष्णिक विद्युत केंद्रामध्ये चंद्रपूर, कोराडी आणि पारस विद्युत केंद्रातून वीज उत्पादन सुरू होते. ९ मिनिटांच्या कालावधीत काही लोकांनी स्वेच्छेने लाईट बंद केली. विशेष म्हणजे मेन स्विच बंद केले नाही. याबद्दल ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी राज्यातील जनतेचे आभार मानले.

## राज्य भार प्रेषण केंद्राचे नियोजन

*दरम्यान, महापारेषणच्या राज्य भार प्रेषण केंद्रातील विजेचे नियोजन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली व संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्री. श्रीकांत राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य भार प्रेषण केंद्राचे मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप, अधीक्षक अभियंता (संचलन) श्री. पीयूष शर्मा यांच्यासह टीमने यशस्वीपणे केले.*



## *प्रगतिपथावर असलेली कामे*

जेजुरी-हिंजेवाडी दुहेरी परिपथ वाहिनी



New Policy

■ दोन लाख शेतकऱ्यांना फायदा होणार ■

# नवे वीजजोडणी धोरण लवकरच : ऊर्जामंत्री

■ *टीम महावितरण/टीम महापारेषण, मुंबई*

राज्यात शेतकऱ्यांना सिंचनासाठी लागणाऱ्या कृषी पंपांसाठीचे मार्च २०१८ पासून प्रलंबित असलेले नवीन वीजजोडणी धोरण लवकरात लवकर अंतिम करण्याच्या सूचना ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी प्रशासनाला दिल्या. यासंदर्भात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगव्दारे घेण्यात आलेल्या प्रदीर्घ बैठकीमध्ये या विषयावर सविस्तर चर्चा झाली.

राज्यात मार्च २०१८ पर्यंत सुमारे ५० हजार कृषीपंपधारकांनी वीजजोडणीसाठी महावितरणकडे पैसे भरलेले आहेत. तर सुमारे दीड लाख कृषीपंपधारकांनी नवीन वीजजोडणीसाठी रितसर अर्ज भरलेले असून त्यावरधोरणाअभावी कोणतीही कार्यवाही झालेली नाही.



याबाबत राज्यातील शेतकऱ्यांकडून वारंवार विचारणा होत असून राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात चर्चा होऊन लवकरात लवकर धोरण करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुषंगाने डॉ. नितीन राऊत यांनी या विषयावर धोरण प्रस्तावित करण्याच्या सूचना विभागाला दिल्या होत्या.

प्रस्तावित धोरणामध्ये १०० मीटरपेक्षा कमी अंतर असलेल्यांना लघुदाब वाहिनीवरून तर १०० ते ६०० मीटर अंतर असलेल्या कृषी पंपाना उच्च दाब प्रणाली वरून वीज जोडणी प्रस्तावित केली आहे. या शिवाय ६०० मीटरपेक्षा अधिक अंतर असलेल्या कृषी पंपधारकांना सौरऊर्जा संयंत्र पुरवठा करण्याचे प्रस्तावित केले आहे. एकाच वेळी पारंपरिक व सौरऊर्जा या अपारंपरिक स्त्रोताव्दारे वीजजोडणी प्रस्तावित आहे. तसेच अशी नवीन जोडणी करतांना कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग तसेच अन्य विभागाशी समन्वय करून हे धोरण सर्वंकष कसे होऊ शकेल याबाबत संबंधित विभागाशी सल्ला मसलत करून धोरण अंतिम करावे व तसेच याबाबत आवश्यकतेनुसार सर्व संबधित विभागांसह क्षेत्रीय स्तरावर संबंधित विभागांसमवेत समन्वय साधून सर्वेक्षण करण्याच्या सूचना डॉ. नितीन राऊत यांनी दिल्या. यावेळी ऊर्जा राज्यमंत्री श्री. प्राजक्त तनपुरे, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. असीम गुप्ता आणि महावितरणचे सर्व संचालक सहभागी झाले होते.

---

नवे विधेयक

■ ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांची माहिती ■

# विद्युत सुधारणा विधेयकावर अभ्यासगट लवकरच अहवाल देणार

■ *टीम महापारेषण/टीम महावितरण/ टीम महानिर्मिती नागपूर*

केंद्र शासनाच्या प्रस्तावित विद्युत सुधारणा विधेयक २०२० प्रारूपावर वीज क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचा अभ्यासगट लवकरच अहवाल देणार असल्याचे राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी सांगितले. यासंबंधीचे निर्देश त्यांनी प्रधान सचिव (ऊर्जा) यांना दिले.

प्रस्तावित विद्युत सुधारणा विधेयक २०२० च्या अनुषंगाने डॉ. राऊत यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे प्रधान सचिव (ऊर्जा) (प्रभारी) श्री. दिनेश वाघमारे, महानिर्मितीच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्रीमती शैला ए., व तिन्ही कंपन्यांचे संचालक यांच्याशी विद्युत भवन, नागपूर येथून संवाद साधला.

महावितरणचे संचालक (वाणिज्य) श्री. सतीश चव्हाण यांनी या सुधारणा विधेयकावर महावितरणच्या भूमिकेतून संगणकीय सादरीकरण केले. तर श्रीमती शैला ए. यांनी महानिर्मिती निगडित विषयांची उकल केली. ऊर्जामंत्री म्हणून वीज सुधारणा विधेयकाबाबत अभ्यासपूर्ण भूमिका मांडणार असल्याचे डॉ. नितीन राऊत म्हणाले. त्यापूर्वी वीज क्षेत्रातील विविध कामगार संघटनांची बाजूदेखील समजून घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



**नागपूर :** प्रस्तावित विद्युत सुधारणा विधेयक २०२० च्या अनुषंगाने बोलताना राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत. शेजारी वरिष्ठ अधिकारी वर्ग.


प्रस्तावित विद्युत सुधारणा विधेयक २०२० च्या प्रारूपात त्रुटी असून त्यातील अनेक तरतुदी अस्पष्ट आहेत. या विधेयकामुळे राज्याच्या अखत्यारित असलेल्या वीज क्षेत्राचे महत्त्व टप्प्याटप्प्याने संपुष्टात येऊ शकते. विधेयक सुधारणेच्या नावाखाली खासगीकरणाचा डाव तर रचला जात नाही ना? अशी शंका डॉ. राऊत यांनी उपस्थित केली. त्यासाठी प्रस्तावित विधेयकाची कारणमीमांसा करण्यात येणार आहे.

---



## *प्रगतिपथावर असलेली कामे*

बाळापूर-पारस वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी



सामाजिक जबाबदारी

■ कोरोना संकट निवारणासाठी पुढाकार ■

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी महापारेषणकडून साडेपाच कोटी रूपये

■ *टीम महापारेषण, मुंबई*

*कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक मदतीसाठी केलेल्या आवाहनाला राज्यातील ऊर्जा विभागाच्या महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने चांगला प्रतिसाद दिला आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी महापारेषणने सुमारे साडेपाच कोटी रूपये जमा केले आहेत, अशी माहिती महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी दिली.*

*कोरोना संकट निवारणासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांसाठी आर्थिक अडचण येऊ नये, यासाठी ही मदत देण्यात येत असल्याचे महापारेषणने स्पष्ट केले आहे. यापूर्वी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुमारे १ कोटी ५५ लाख ४३ हजार ३६१ रुपये देऊन महापारेषणने प्रतिसाद दिला होता. आता महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एका दिवसाचे वेतन सुमारे १ कोटी ९३ लाख ३५ हजार ७६२ रूपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीला दिले आहेत. तसेच महापारेषणच्या सांघिक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) फंडातून तब्बल दोन कोटी रूपये राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाला दिले आहेत. त्यामुळे कोरोनाच्या लढाईसाठी महापारेषणने एकूण सुमारे साडेपाच कोटी रूपये दिले आहेत.*

*महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे म्हणाले, 'कोरोना' विषाणूमुळे निर्माण झालेल्या भीषण परिस्थितीशी सामना करण्यासाठी सरकारकडून योग्य त्या उपाययोजना केल्या जात आहेत. महापारेषणकडूनही योग्य ती खबरदारी घेतली जात आहे. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनीही महापारेषणच्या कामाचे जाहीर कौतुक केले आहे. वीजपुरवठा अखंडित व चांगल्या क्षमतेने ठेवण्यासाठी कर्मचारी परिश्रम घेत आहेत.''*

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

एक हात मदतीचा



नागपूर : मुख्यमंत्री कोविड-१९ सहाय्यता निधीचा धनादेश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांना सोपविताना अधिकारी संघटनेचे पदाधिकारी. शेजारी जिल्हाधिकारी श्री. रवींद्र ठाकरे, पोलीस आयुक्त डॉ. भूषणकुमार उपाध्याय.

■ मुख्यमंत्री सहाय्यता निधीत योगदान ■

# अधिकारी संघटनेतर्फे तीन लाखांची मदत

■ *टीम महापारेषण, नागपूर*

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेतर्फे मुख्यमंत्री कोविड-१९ सहाय्यता निधीसाठी दोन लाख रूपयांचा धनादेश राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांना सोपविण्यात आला.

नागपूरचे जिल्हाधिकारी श्री. रवींद्र ठाकरे यांच्यामार्फत या निधीचा धनादेश राज्याचे ऊर्जामंत्री व नागपूरचे पालकमंत्री डॉ. नितीन राऊत यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी पोलीस आयुक्त डॉ. भूषणकुमार उपाध्याय उपस्थित होते. धनादेश हस्तांतरित करताना अधिकारी संघटनेचे केंद्रीय कार्याध्यक्ष श्री. प्रवीण काटोले, पतसंस्थेचे सचिव श्री. नीलेश जुमळे, नागपूर परिमंडळाचे सचिव श्री. अतुल राऊत आदी उपस्थित होते.

तत्पूर्वी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेतर्फे एक लाख रूपयांच्या निधीचा धनादेश मुख्यमंत्री कोविड-१९ सहाय्यता निधीसाठी देण्यात आला. अधिकारी संघटनेकडून तीन लाख रूपयांच्या निधीचा धनादेश देण्यात आला आहे.

या कामी संघटनेचे अध्यक्ष श्री. सुनील पाठक, सरचिटणीस श्री. मनोज ठवरे, सचिव श्री. संजय खाडे, संघटनेचे कार्याध्यक्ष (महापारेषण) श्री. मंगेश शिंदे, उपसरचिटणीस श्री. सतिश जाधव (महापारेषण) औरंगाबाद परिमंडळ अध्यक्ष श्री. प्रदीपसिंह बायस यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला.

मदतीचा हात





नागपूर : राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी ३० वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या संकल्प या संस्थेमार्फत दि. १५ एप्रिल २०२० पासून गरिबांना दररोज पंचवीस हजार जेवणाचे डबे तयार केले जात आहेत. तसेच ते गरजुपर्यंत पोहोचविण्यात येत आहेत. या उपक्रमाला श्री. जे. एस. पाटील, अध्यक्ष ILU यांनी भेट देऊन ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांचे अभिनंदन करून चर्चा केली.

वेबिनार संवाद

■ सौरऊर्जा उत्पादकांची समिती गठित करण्याची सूचना ■

# ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केली सौरऊर्जा उत्पादकांशी चर्चा

■ *टीम महापारेषण/ टीम महावितरण, नागपूर*

सौरऊर्जेला अधिक गतिमानतेने चालना देण्यासाठी तसेच या क्षेत्रातील विविध अडचणी वेळेत निकाली काढण्यासाठी महावितरण, महाऊर्जा आणि सौरऊर्जा उत्पादकांची संयुक्त समिती गठित करण्यात यावी. तसेच विदर्भात ५०० मेगावॅट सौर उद्यान उभारण्यासंबंधीचा प्रस्ताव तयार करण्यात यावा, अशा सूचना राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी वीज अधिकाऱ्यांना दिल्या.

विद्युत भवन, नागपूर येथून वेबिनारव्दारे त्यांनी राज्यातील सौरऊर्जा उत्पादकांशी संवाद साधला. महाराष्ट्रात सौरऊर्जा धोरणाच्या अंमलबजावणीत मोलाची भूमिका बजावल्याबद्दल सौरऊर्जा उत्पादकांनी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांचा सत्कार केला.

वेबिनारमध्ये सौरऊर्जा उत्पादकांनी आपल्या मागण्या मांडल्या. यात घरगुती सोलर प्रकल्पावर केंद्र शासनाप्रमाणे अनुदान सुरू करण्यात यावे, महावितरणप्रमाणे महाऊर्जेला सबसिडी वाटपाचे अधिकार देण्यात यावेत,

महाऊर्जाकडे असलेली व्हेंडर नोंदणी यादी महावितरणने घ्यावी, नवीन अर्ज सोपा असावा आदींचा समावेश आहे. सौरऊर्जेच्या दृष्टीने आगामी काळात सकारात्मक धोरण स्वीकारून पुढील पाऊले उचलली जातील, असा विश्वास ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी यावेळी दिला.

वेबिनारमध्ये प्रधान सचिव (ऊर्जा) (प्रभारी) श्री. दिनेश वाघमारे, महाऊर्जाचे महासंचालक श्री. सुभाष डुमरे, महानिर्मितीच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती शैला ए., महावितरणचे संचालक श्री. सतीश चव्हाण यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.



नागपूर : सौरऊर्जा धोरणाच्या अंमलबजावणीत मोलाची भूमिका बजावल्याबद्दल सौरऊर्जा उत्पादकांनी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांचा सत्कार केला.

वेबिनार चर्चा

■ सद्यस्थितीतील आव्हाने आणि उपाय यावर चर्चा ■

# 'स्टेट इनीशिएटिव्हज इन पॉवर ट्रान्समिशन' विषयावर वेबिनार मालिका

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

'स्टेट इनीशिएटिव्हज इन पॉवर ट्रान्समिशन' या विषयावर नुकतीच वेबिनार मालिका घेण्यात आली. तसेच 'महाट्रान्सको इनीशिएटिव्हज इन पॉवर ट्रान्समिशन' या विषयावर व्हिडिओ सत्र घेण्यात आले.

व्हिडिओ वेबिनार सत्रात २० मिनिटांचा वेळ सादरीकरणासाठी देण्यात आला होता. यावेळी विविध प्रश्नोत्तरे घेण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने ट्रान्समिशन नेटवर्क विकास आणि गुंतवणुकीसाठी आपल्या राज्याच्या योजना काय आहेत? सध्या कोणती मोठी आव्हाने आहेत? त्यावर मात करण्यासाठी आपल्या राज्यात कोणते उपक्रम घेण्यात आले आहेत? पुरवठादार, तंत्रज्ञान पुरवठा करणारे आणि कंत्राटदारांकडून आपल्या काय अपेक्षा आहेत? आपल्या राज्याच्या ऑपरेशन्स, पुरवठा साखळी, आर्थिक कामगिरी आणि नेटवर्क प्लॅनवर कोविड-१९ चा अल्पकालीन आणि दीर्घकालीन परिणाम काय झाला आहे? यावर चर्चा करण्यात आली.

महापारेषणसमोरील सध्याची आव्हाने काय आहेत? यावर चर्चा करण्यात आली. महावितरणकडून प्राप्त होणारे एमटीसी शुल्क पूर्णपणे प्राप्त झाले नाहीत. त्यांची बिल संकलन केंद्रे बंद झाल्यामुळे उद्योग बंद पडले आहेत. त्यामुळे महावितरणला महसूल कमी प्रमाणात मिळत आहे. कोविड-१९ कामासंबंधित पोलिस दल व्यस्त असल्याने विजक्षेत्रांतील कामांसाठी पोलिस संरक्षण मिळण्यास अडचण येत आहे. वेळ, मनुष्यबळ, सामुग्री व्यवस्थापन कार्यान्वित करण्यासाठी महापारेषण प्रयत्नशील आहे. प्रकल्पांची कामे मुदतीत होण्यासाठी महापारेषणकडून पुढाकार घेतला जात आहे. या वेबिनारमध्ये संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्री. श्रीकांत राजूरकर, कार्यकारी संचालक श्री. श्रीकांत जलतारे, कार्यकारी संचालक (मा. सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, महापारेषणच्या सर्व मुख्य अभियंत्यांसह विजक्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले होते.



## *प्रगतिपथावर असलेली कामे*

चाळीसगाव-पाचोरा वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी



कोरोनाशी दोन हात

■ उपलब्ध भंगार सामानातून केली निर्मिती ■

# ऐरोली संकुलात हात निर्जंतुकीकरण संच




ऐरोली : कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर महापारेषणच्या ऐरोली संकुलाच्या दोन्ही मुख्य प्रवेशव्दारावर हात निर्जंतुकीकरण संच बसविण्यात आला आहे. तो संच कार्यान्वित करताना वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी, शेजारी अधीक्षक अभियंता श्री. भूषण बल्लाळ व कार्यकारी अभियंता (स्था.) श्री. मोहन ननवरे व अन्य कर्मचारी.

■ *टीम महापारेषण, वाशी*

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर महापारेषणच्या ऐरोली संकुलाच्या दोन्ही मुख्य प्रवेशव्दारावर हात निर्जंतुकीकरण संच बसविण्यात आला आहे. त्याकरिता एक संकल्पचित्र तयार करून संकुलामध्ये उपलब्ध असलेल्या भंगार सामानातून याची निर्मिती केली आहे. दरम्यान, यामुळे संकुलामध्ये राहणाऱ्या सुमारे पाचशे रहिवासी, संकुलामध्ये दैनंदिन प्रवेश करणारे सुमारे दोनशे अधिकारी व कर्मचारी आणि शंभर अभ्यागतांची सोय झाली आहे.

लॉकडाऊनच्या काळात कमीत-कमी वेळेत मे. धर्मा एंटरप्रायझेसच्या सहकार्याने हात निर्जंतुकीकरण संच तयार करून संकुलाच्या दोन्ही मुख्य प्रवेशव्दारावर बसविण्यात आले. सदर संच वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी यांच्या हस्ते कार्यान्वित केले.

कोविड-१९ या विषाणूचा फैलाव सुरू झाल्यानंतर केंद्र शासन, महाराष्ट्र शासन आणि महापारेषण प्रशासनाच्या वतीने विविध उपाययोजना सुरू करण्यात आल्या. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या आदेशानुसार कंपनीच्या प्रशासनाने सांघिक व वैयक्तिक पातळीवर घ्यावयाच्या खबरदारीच्या संदर्भात वेळोवेळी आदेश काढून जनजागृती केली आहे.

याचाच भाग म्हणून वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी यांनी केलेल्या आवाहनानुसार ऐरोली संकुलातील सर्व रहिवासी वसाहतीत विविध कार्यालयांचे क्षेत्र आणि राज्य भार प्रेषण केंद्र परिसराचे नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने रासायनिक फवारणी करून निर्जंतुकीकरण करून घेतले.

ऐरोली अति उच्च दाब स्थापत्य मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. भूषण बल्लाळ व ऐरोली विभागाचे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. मोहन ननवरे यांनी याबाबत संकल्पना मांडली. त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# महाराष्ट्र दिन व कामगार दिन महापारेषणमध्ये साधेपणाने साजरा

*टीम महापारेषण, मुंबई*

कोरोना विषाणू प्रार्दुभावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत ६० वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन साधेपणाने साजरा करण्यात आला. सोशल डिस्टन्सिंग पाळून काही वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोजक्याच संख्येने उपस्थित होते.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे एप्रिल-मे २०२०

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. महेंद्रकुमार चंद्रकांत वाळके | मुख्य अभियंता (पारेषण) | अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ, औरंगाबाद | ०८.०५.२०२० |

जय भिमराय

■ संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून भीमजयंती साजरी ■

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती डिजिटल स्वरूपात उत्साहात साजरी

■ *टीम महापारेषण, मुंबई*

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२९ वी जयंती डिजिटल स्वरूपात उत्साहात साजरी करण्यात आली. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या मोबाईलवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा डीपी (डिजिटल फोटो) म्हणून ठेवून अनोख्या पध्दतीने अभिवादन केले.

ठिकठिकाणी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. काही अधिकाऱ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकांचे वाचन केले. तर काही कर्मचाऱ्यांनी भीमगीते गाऊन अनोख्या पध्दतीने जयंती साजरी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.




जय बसवण्णा

# महात्मा बसवेश्वर यांची जयंती डिजिटल स्वरूपात साजरी

■ *टीम महापारेषण, मुंबई*

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत महात्मा बसवेश्वर यांची जयंती डिजिटल स्वरूपात उत्साहात साजरी करण्यात आली. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या मोबाईलवर महात्मा बसवेश्वर यांची प्रतिमा डीपी (डिजिटल फोटो) म्हणून ठेवून अनोख्या पध्दतीने अभिवादन केले.





## *प्रगतिपथावर असलेली कामे*

बाळापूर-पारस वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी



From the Desk of ED, HR

# संघर्षाला सकारात्मतेची जोड हवी




वास्तववादी जगात अनेकांना संघर्ष करावा लागतो. हा संघर्ष कधी-कधी पराकोटीचाही असू शकतो. जन्मापासून ते मृत्युपर्यंत हा संघर्ष करावा लागतो. जीवनाच्या टप्प्यावर या संघर्षाचे स्वरूप काही प्रमाणात बदलू शकते.

दुनिया में कितना गम है, मेरा गम कितना कम है! ही एका गाण्याची ओळ आपल्याला प्रेरणादायी ठरते. अनेकजण छोट्या संघर्षाला सामोरे जातात व त्यांच्या मनात त्याबाबत अनाठायी भीती व तणाव निर्माण होतो. या भीती व तणावामुळे मानसिक व पुढे जाऊन शारीरिक स्वास्थ बिघडते. त्याचा एकंदरीत मानवी जीवनावर परिणाम होत असतो.

जीवनात संघर्ष हा आपल्याला वेदना देत असतो. मात्र, त्यास सकारात्मक विचार करून आपल्यामधील क्रियाशक्ती अधिक प्रमाणात जागृत करण्याची चांगली संधी आहे, असे समजावे. त्या वेदनेने निर्माण झालेल्या संवेदनेच्या माध्यमातून योग्य धडा घेऊन आपला उत्कर्ष साधता आला पाहिजे. शेवटी, त्यालाच जीवन सार्थकी लागणे, असे म्हणतात.

शुन्यातून जग निर्माण करण्यातच खरा आनंद दडला आहे. फिनिक्स पक्ष्यांप्रमाणे राखेतून उठून पुन्हा आपण उंच भरारी घेतली पाहिजे. शेवटी तो आनंद घेण्यासाठी केलेले अफाट परिश्रम जीवन सार्थकी झाल्याची अनुभूती देते. जीवनात अनेक वेळा संघर्ष एवढा पराकोटीचा असतो. त्यामुळे साहजिकच आपल्याला प्रश्न पडतो की, आता आपण जगतो की मरतो. मात्र, चांगल्या प्रयत्नांना नेहमी सहकार्य मिळत जाते. तसेच आपण त्या संकटातून सहीसलामत बाहेर पडतो. त्यासाठी जिद्द, चिकाटी, उमेद, सुविचारीपणा हे गुण आपल्या अंगी असणे आवश्यक आहेत. अतिशय महत्त्वाची बाब म्हणजे आपली क्रियाशक्ती उंच पातळीवर घेऊन जाते. सतत प्रयत्नशील राहिल्यामुळे संघर्षातून पुढे जाण्यास आपल्याला शिकवण मिळते.

अनेक मोठ्या व्यक्ती संघर्षातूनच तर घडलेल्या आहेत, याची उदाहरणे आपण समाजात पाहतो. संघर्षातून तावून-सुलाखून निघाल्याशिवाय त्या घडत नाहीत. त्यामुळेच तर त्यांच्या संघर्षाची वाटचाल आपल्याला प्रेरणादायी वाटते. त्यासाठी मात्र, आपण सकारात्मक दृष्टिकोन बाळगायला हवा.

दुनिया में हम आये है, तो जीना ही पडेगा! ही एका गाण्याची ओळ आपल्याला संघर्ष जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे, असे सांगते. जर तसे आहे तर मग त्यास आनंदाने व प्रेमाने सामोरे जाऊन जिद्दीने पुढे जायचे आहे. मग, खचायचे कशाला? नैराश्याची किंचीत सावलीही आपल्या क्रियाशक्तीवर पडता कामा नये. विशेष म्हणजे नीतीतत्त्वे, आदर्श मूल्यांची तडजोड न करता संघर्षाला सामोरे जाता आले पाहिजे. जर चुकीचे काहीतरी करून संघर्षातून वाट काढली तर त्यातली मजा निघून जाईल व सतत त्याबाबत कटुतेचा अनुभव आपल्याला येत राहील.

जीवन एक संघर्ष आहे, हे आपण आधी मान्य केले पाहिजे. त्यातच खरी मजा आहे. कोण कसा त्याला सामोरे जातो. कोणी त्यास लागणारे कठीण परिश्रम करून विजय मिळवितो. कोणी चुकीच्या पध्दतीने आदर्श मूल्यांशी तडजोड करून लवकरच आपला मार्ग सुकर करतो, तर कोणी त्यास शरण जातो. तसेच खचून जाऊन मग हार पत्करतो. कोणताही शॉर्टकट न वापरता, कोणत्याही आदर्श मूल्यांना पायदळी न तुडवता त्यावर मात करतो, तो खरा विजयी असतो. मग मात्र, त्यातील आनंद आपल्याला गोडवा देतो, अर्थातच मनाला उभारी देतो. जर आपण त्यामध्ये यशस्वी झालो नाही तर आपण मात्र मनापासून प्रयत्न केले, याच्यासारखा दुसरा आनंद नाही.

Success is a Journey to reach a destination, but this journey is equally important. जीवनाच्या प्रत्येक टप्प्याचा आनंद घेता आला पाहिजे. माणसाच्या जीवनात सुख, दु:ख येत राहते. मात्र, त्यामध्ये आपण पाय रोवून कसे उभे राहतो, हे महत्त्वाचे आहे.

संघर्षाची परिसीमा म्हणजे नैराश्य व त्यामुळे निर्माण झालेला तणाव, वैफल्य, न्यूनगंड. त्यामुळे अनेक जण व्यसनांच्या आहारी जातात कशासाठी? तर दु:ख विसरण्यासाठी. परंतु, हा त्यांचा कमकुवतपणा असतो. जीवनात बिघडणे खूप सोपे असते. घडण्यासाठी मात्र अफाट परिश्रम, अपार मेहनत व चांगली नीती असणे आवश्यक आहे. संघर्षरूपी वेदनेला हसतमुखाने सामोरे जा व त्यातून ज्या संवेदना आपल्याला मिळतात, त्या आपल्याला जीवनात काहीतरी नक्कीच शिकवून जातात. त्या अनुभवाच्या जोरावर आपण आपली भविष्यातील प्रगती करू शकतो. माझ्या सर्व सहकाऱ्यांना आवाहन करतो की, प्रतिकूल परिस्थितीतूनही मार्ग निघू शकतो, फक्त त्यासाठी जीवनात सकारात्मक दृष्टिकोन (Positive Approach) अंगी बाळगायला हवा, हे मात्र निश्चित.

**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.